# महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ

## कामगार व कामगार कुटुंबियांसाठी उपक्रम विविध लाभाच्या योजना

महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या वतीने महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ(mseb) राज्य मार्ग परीवहन महामंडळ(ST) सर्व प्रकारच्या बँका,पतपेढ्या, जीवन विमा निगम(LIC),लहान व मोठे कारखाने,काजू प्रक्रिया उद्योग,हॉस्पिटल्स,या ठिकाणी कार्यरत व ज्यांचा कामगार कल्याण निधी कपात होतो (कारखाने अधिनियम १९४८,मुंबई दुकाने व आस्थापना अधिनियम १९४८,मोटार वाहतुक कामगार अधिनियम १९६१, लघुउद्योग,केंद्रीय आणि राज्य शासनाने वितरीत कंत्राट परवाने तसेच पाच अथवा पाचपेक्षा अधिक कामगार काम करतात) अशी सर्व दुकाने आस्थापना,हॉटेल व्यवसाय,ट्रॅव्हल्स,पेट्रोल पंप,संस्था व कारखाने तसेच सुतगिरणी,साखर कारखाने,कापूस जिनींग व प्रेसिंग उद्योग व इतर कारखाने ज्यामधील कार्यरत कामगार व ज्यांचा मुंबई कामगार कल्याण निधी अधिनियम १९५३ च्या कलम ६ नुसार कामगार कल्याण निधी कपात होतो,अशा सर्व कामगार व कामगार कुटुंबियांसाठी खालील योजना सुरु करण्यात आलेल्या आहेत.योजनांचा तपशिल खालीलप्रमाणे असून या योजनांचा लाभ घेण्यासाठी नजीकच्या कामगार कल्याण भवन येथे संपर्क साधावा

## शिष्यवृत्ती योजना

| क्र. | शिष्यवृत्ती प्रकार | शैक्षणिक पात्रता | रक्कम | अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे |
|---|---|---|---|---|
| १. | सर्वसाधारण शिष्यवृत्ती | १० वी ते १२ वी | रु.२०००/- | १) ६० टक्के गुण आवश्यक |
| | | १३ वी ते १५ वी | रु.२५००/- | २) गुणपत्रकाची सत्यप्रत |
| | | १६ वी ते १७ वी(पदव्युत्तर पदवी) | रु.३०००/- | ३) शाळा,कॉलेजमध्ये शिकत असल्याबाबत बोनाफाईड |
| | | १० वी नंतर तांत्रीक(डिप्लोमा) | रु.२५००/- | |
| | | १२ वी नंतर इंजि.,मेडीकल | रु.५०००/- | ४) जुन/डिसेंबर महिन्याची पगारस्लिप |
| | | **M.P.S.C.** पहिला टप्पा उत्तीर्ण | रु.५०००/- | |
| | | **U.P.S.C.** पहिला टप्पा उत्तीर्ण | रु.८०००/- | ५) पालकांचे आधार कार्ड/रेशन कार्ड |
| | | **P.H.D.** रजिस्टर्ड विद्यार्थी | रु.५०००/- | ६) विद्यार्थ्याचे आधार कार्ड |
| २. | उच्चशिक्षण (परदेश शिष्यवृत्ती) | परदेशात उच्च शिक्षण घेणारे विद्यार्थी | रु.५०,०००/- | ७) बँक पासबुक प्रत<br>८) परदेश शिष्यवृत्ती करीता पासपोर्ट,व्हिजा व तेथील बोनाफाईड फी सवलत |
| ३. | क्रीडा शिष्यवृत्ती | राज्यस्तरावर पोहोचलेला खेळाडू | रु.५०००/-<br>रु.३०००/-<br>रु.२०००/- | ९) क्रीडा शिष्यवृत्तीकरीता त्या त्या स्तरावरील प्रमाणपत्रे |
| | | राज्यस्तरावरुन राष्ट्रीय पातळी-पर्यंत पोहोचलेला उत्कृष्ट खेळाडू | रु.७०००/-<br>रु.५०००/-<br>रु.३०००/- | |
| ४. | विशेष क्रीडा शिष्यवृत्ती | आंतरराष्ट्रीय पातळीपर्यंत पोहाचलेला उत्कृष्ट खेळाडू | रु.१५,०००/- | |